# महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय :- महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.**

दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपिस्थत होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री मधुकर गायकवाड | : मा. कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| २. | श्री बाळासाहेब कोळरो, सहसचिव (कामगार विभाग, मंत्रालय),मुंबई | : शासकीय सदस्य |
| ३. | श्री शि. म. म्हात्रे, सहसचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | : शासकीय सदस्य |
| ४. | श्रीमती सरोज देशपांडे, कल्याण आयुक्त, नागपूर | : शासकीय सदस्य |
| ५. | श्री रमेश सारडा | : मालक प्रतिनिधी सदस्य |
| ६. | श्री अनिल दत्तात्रय ढवळे | : मालक प्रतिनिधी सदस्य |
| ७. | श्री महेश मुद्दा | : मालक प्रतिनिधी सदस्य |
| ८. | श्री प्रकश देवतळे | : मालक प्रतिनिधी सदस्य |
| ९. | श्री केदार काळे | : मालक प्रतिनिधी सदस्य |
| १०. | श्री वसंत गणपत सावंत | : कामगार प्रतिनिधी सदस्य |
| ११. | श्री मुनवर शेख | : कामगार प्रतिनिधी सदस्य |
| ११. | श्री राजेश फुले | : कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १२. | श्री.दादाराव डोंगरे | : कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १३. | श्रीमती राधिका गायकवाड | : कामगार प्रतिनिधी सदस्य |
| १४. | श्री व्हि. के. बुवा, कामगार उप आयुक्त, मुंबई | : सचिव |

सर्वप्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. बैठकीच्या सुरुवातीस सर्व उपस्थितांना इमारत व बांधकाम मंडळाच्या सर्व योजनांतर्गत दिलेल्या लाभांचा तक्ता माहितीसाठी पुरविण्यात आला. तद्नंतर विषय सुचीनुसार बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.१ :- दिनांक २५/०३/२०१३ रोजी मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे**

श्री.दादाराव डोंगरे, यांनी मंडळाच्या निदर्शनास आणुन दिले की, मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे व नियमाप्रमाणे ७ ते १५ दिवसांपुर्वी मागील बैठकीचा इतिवृत सर्व सदस्यांना देण्यात आला पाहीजे, परंतु तसे होत नाही. बैठकीचे पत्र, इतिवृत व अजेंडा एक/दोन दिवस अगोदर प्राप्त होत असतात. तरी या सर्व बाबीचा विचार करण्यात यावा. श्री.डोंगरे व श्री.ढवळे यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे ठराव बुक तयार करण्यात आलेले नाही. मंडळाने ती विकत घेऊन आता पर्यत झालेल्या सर्व बैठकीचे इतिवृत्त/ठराव बुक पुर्ण करुन घेण्यात यावे. असे सुचविले.

यावर शासकिय सदस्य श्री बाळासाहेब कोळसे, सहसचिव (कामगार विभाग, मंत्रालय), मुंबई यांनी मंडळाच्या असे निदर्शनास आणुन दिले की, बैठकीच्या कामकाजाचे स्वरुप खालील प्रमाणे असावे व तशी कार्यपध्दती असल्याचे सांगितले.

अनु.क्रमांक, विषय, मंडळाच्या बैठकीत झालेली चर्चा, घेतलेले निर्णय, अंमलबजावणी अधिकारी, अंमलबजावणी कालावधी हयाप्रमाणे कार्यवाही करावी त्यास सर्व मंडळ सदस्यांनी स्वागत करुन मान्यता दिली. मागील सर्व बैठकीचे इतिवृत्त/ठराव इत्यादी कामकाजासाठी दोन लिपीकांच्या मदतीने ८ दिवसांत सदर कामकाज पुर्ण करण्यात यावे. श्री.डोंगरे यांनी मागील बजेट मिटींगमध्ये संभाव्य मेडीक्लेम व अपघात विमा योजनेसाठी टोकन रु.१० कोटी तरतुद ठेऊन उप-समिती गठीत करुन पॉलीसी निश्चित करण्याचे सर्वानुमते मान्य झाल्याचे निदर्शनास आणुन दिले व त्याची नोंद इतिवृत्तांत नसल्याचे निदर्शनास आणले. अध्यक्षांनी त्याची दखल घेऊन इतिवृत्तांत नमुद करण्याचे सुचना दिल्या.

उपरोक्त चर्चेअंती दिनांक २५/०३/२०१३ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सन्माननीय सदस्य श्री.फुले यांनी लवकरात लवकर पदे भरण्याबाबत सुचित केले की, कामकाज वेळेत व्हावीत यासाठी पावले उचलावीत. अनेक नोंदण्या हया प्रलंबित आहेत. विदर्भातील आमदार सांगतात तरी अद्यापही नोंदणी होत नाही. या संदर्भात श्री.फुले यांनी नाराजी व्यक्त केली. श्री.डोंगरे यांनी जिल्हास्तरावर अधिकार प्रदान करुन त्रिसदस्यीय समिती बनवावी त्यामध्ये विभाग प्रमुख, एक मालक प्रतिनिधी, एक कामगार प्रतिनिधी अशा तीन लोकांची समिती बनवुन योजनांच्या लाभाच्या मंजूरीसाठी अधिकार प्रदान करावेत असे सुचित केले व नोंदणीसाठी कामगार संघटनांना अधिकार देऊन रु.७५/- याप्रमाणे मंडळाने संघटनेला फी द्यावी. श्री.म्हात्रे यांनी नमुद केले की, यासाठी टेंडर पध्दतीने कामकाज करणे योग्य होईल. मा.अध्यक्षांनी प्रस्तावित केले की, सदर कामकाज विहीत मुदतीत साधारणतः एक महिन्यामध्ये जाहीरात देऊन टेन्डर मागवावे व कामकाज नियमावली तयार झाल्यानंतरच करता येणे शक्य आहे. यासाठी नोंदणीकृत बांधकाम व्यवसायातील कामगार संघटना ज्यांना ३ वर्षाचा अनुभव असेल अशा संघटनाकडून टेन्डर मागवावे. श्री.डोंगरे यांनी अर्ज नमुना सादर केला असून तो मान्य असावा असे ठरले. परंतु या ठिकाणी सांगण्यात आले की, मंडळाने दोन लाख नमुने नोंदणी अर्ज नमुना छापुन ठेवले असल्याने असे ठरले की, नियमावलीमध्ये बदल करणे आवश्यक राहील.

चर्चेअंती निविदा मागविण्याकरीता खालील पात्रता असणे आवश्यक राहील असे सर्वानुमते ठरले.

१) बांधकाम क्षेत्रातील काम करणा-या ३ वर्षे अस्तित्वात असलेल्या नोंदणीकृत कामगार संघटनाकडून निविदा मागविण्यात याव्यात.

२) कामगार संघटनेने सर्व बांधकाम प्रकल्पांना भेट देऊन विहीत अर्ज नमुन्यामध्ये त्यांची माहिती भरुन घ्यावी.

३) अर्जासोबत सर्व संबंधित कागदपत्रे जोडण्यात आलेली आहेत याची खात्री करावी.

४) संबंधित कामगार कार्यालयाकडे सदर अर्ज व कागदपत्रे दाखल करावीत.

५) स्थानिक बांधकामाच्या ठिकाणी नोंदणी शिबिर आयोजीत करावेत.

६) संबंधित कामगार अधिकारी यांनी तपासणी केल्यानंतर पात्र अर्जाचे चलन घ्यावे.

परंतु यासाठी शासनाने नियमावली मान्य केल्यासच कार्यवाही करता येईल हे अध्यक्षांनी

सर्वांचे निदर्शनास आणले.

सन्माननीय सदस्य श्री.फुले यांनी नाका कामगारांसाठी नोंदणी शिबिर घेण्यात यावे व प्रतिज्ञापत्र घेऊन नोंदणी करावी असे सांगीतले.

यावर मा.अध्यक्षांनी असे सांगीतले की, ९० दिवसांच्या अटीच्या बदलाचे अधिकार मंडळाला नाहीत. सदर प्रक्रिया राज्यस्तरावर प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य श्री.डोंगरे यांनी टास्क फोर्स निर्माण करण्याबाबत पुन्हा प्रस्तावित केले. चर्चेअंती सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल असे ठरले त्यामध्ये संबंधित जिल्हयांतील सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी, एक मालक प्रतिनिधी, एक कामगार प्रतिनिधी असावेत. त्याचे काम सेस कलेक्शनाबाबत आढावा घेणे, नोंदणीबाबत आढावा घेणे व कोणत्याही बांधकाम कामकाजावर देखरेख ठेवणे इत्यादी राहील.

सन्माननीय सदस्य श्री.केदार काळे यांनी सांगीतले की, जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या जिल्हा नियोजन समितीवर विभागवार मंडळ सदस्यांना कायम निमंत्रीत सदस्य म्हणुन घेण्यात यावे. याबाबत शासन पातळीवर प्रस्ताव मांडण्यात येईल असे मा.अध्यक्षांनी सांगीतले.

श्री.फुले यांनी नागपुर येथील मंडळाच्या कामकाजासाठी एक कार्यालय अपर कामगार आयुक्त यांच्या जुन्या कार्यालयाच्या ठिकाणी घेण्याचे सुचित केले. या बाबत विचार करण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगीतले. श्री.डोंगरे यांनी फिरते पाळणाघराकरीता वाहने घ्यावीत व यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी असे सुचित केले. या बाबत तपासणी करण्यात येईल असे मा.अध्यक्षांनी सांगीतले.

श्री.फुले यांनी विभागवार अकॅडमीची सुचना केली. यावर मा.अध्यक्षांनी यावर सांगीतले की, नियमामध्ये ही बाब अंतर्भूत करावी लागेल कारण कायद्याच्या कलम २२ व्यतिरिक्त कोणतीही कल्याणकारी योजना राबवावयाची असल्यास शासनाची मंजूरी आवश्यक आहे, व नियमावली तयार करणे गरजेचे आहे.

कौशल्यवृध्दी योजनेसाठी श्री.डोंगरे यांनी प्रस्तावित केले की, इतर तांत्रिक प्रशासकिय संस्थामार्फत फी देऊन त्यांच्याकडून इतर तांत्रिक प्रशिक्षण सामावुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत या बाबत अध्यक्षांनी संबंधितांची बैठक घेण्यात येईल असे सांगीतले.

मा.अध्यक्ष महोदयांनी मंडळ सदस्य प्रधान सचिव यांचे मनोगत अवगत करुन दिले की, बांधकाम कामगारांच्या मुलांना एमएससीआयटी व इंग्रजी शिक्षणासाठी योजना राबवाव्यात यावर चर्चा होऊन असे ठरले की, बांधकाम कामगारांच्या मुलांना एमएससीआयटी ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास तिची पुर्ण रक्कम देण्यात येईल. याशिवाय योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात येईल तसेच इंग्रजीकरीता टयुशन फिसाठी रु.१५००/- निश्चित करण्यात आले.

**विषय क्र.२:- मेडीक्लेम आणि अपघात विमा योजनेबददल उप समितीने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे**

मेडीक्लेम व अपघात विमा योजनेबददल झालेला तपशिल सचिवांनी विशद केला. जाहीरातीद्वारे ब्रोकर/ सल्लागार आय.आर.डी.ए.संस्थेने प्रमाणित केलेले यांचे अर्ज (लेटर ऑफ एक्सप्रेशन) मागविले. एकुण ५ ब्रोकरनी पत्र दिले. यात जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे १) खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी असणे आवश्यक आहे.व अशा कंपनीने तीन वर्षापेक्षा जास्त या व्यवसायात असणे आवश्यक आहे. (२) अशा कंपनीचे पुर्ण महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांत शाखा असणे आवश्यक आहे व अशा कंपनीकडे आवश्यक संसाधने व मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. जेणेकरुन पुर्ण राज्याचा समावेश करता येईल. (३) अशा कंपनीने शासकिय अथवा निमशासकिय संस्थांच्यावतीने अशाप्रकारचे काम अथवा इतर काम केले असले पाहीजे यावर सर्वांना सादरीकरण करण्यास सांगीतले. व त्यानंतर सर्वांच्या कार्यक्षमतेचे पृथःकरण करण्यात आले.

पुन्हा दुस-यांदा सर्व ब्रोकर्सना दिनांक १८/६/२०१३ रोजी संधी देण्यात आली. त्यांचेकडून संभाव्य मेडीक्लेन व अपघात विमा प्रस्ताव ८३,३०० कामगारांसाठी व इतर आवश्यक बाबींवर सादरीकरण करुन घेण्यात आले. त्यात एल.ॲण्ड जी.ही संस्था योग्य वाटल्याने त्यासंस्थेस पुर्ण राज्याचे काम देण्यात आले. सदर संस्था राज्य शासनाच्या शेतकरी अपघात विमा योजनेचेही काम करतात असे निदर्शनास आणले. मेडीक्लेम व अपघात योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे ठरविले गेले.

१) १+५ कुटूंबातील व्यक्तींना लाभ
२) रु.दोन लाख पर्यंत वर्षभरात वरील कुटूंबीयांना कॅशलेस लाभ
३) सर्व प्रकारच्या दुर्धर आजारावर उपचार
४) सहाय्यक संस्थेमार्फत कोटेशन मागवून प्रिमियम अंतिम करण्याचे अधिकार उप समितीला दिल्याचे सर्वानुमते ठरले.

दोन्ही बैठकीत श्री.सारडा व श्री.डोंगरे हे समिती प्रतिनिधी म्हणुन हजर होते. वरील त्याचप्रमाणे होणा-या प्रत्यक्ष पॉलीसीच्या कार्यवाही होण्यास सर्वानमुते मान्यता देण्यात आली.(प्रमियम रेट इत्यादी) पुढील बैठकीत ठेवण्याच्या सुचना अध्यक्षांनी केल्या.

वरील कार्यबाहीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली व खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र.** :- मेडीक्लेम व अपघात विमा योजनेची कार्यवाही अध्यक्षांच्या अध्यक्षतेखालील समितीने ज्यात सचिव, श्री.सारडा, श्री.डोंगरे, लेखा अधिक्षक आहेत त्यांनी पार पाडावी व तपशिल पुढच्या बैठकीत ठेवावा

सुचक :- श्री.फुले

अनुमोदक :- श्री.डोंगरे

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

श्री.काळे यांनी सांगीतले की, या व्यतिरिक्त राजीव गांधी योजना उपलब्ध आहे परंतु दोन्हीचा फायदा लागु करता येईल काय हे तपासावे लागेल.

श्री.डोंगरे यांनी सांगीतले की, ~~स~~ ~~कामगारांना~~ मिळणारे लाभ हे अतिरिक्त लाभ आहेत.

श्री.म्हात्रे यांनी सांगीतले की, सदर योजना ओव्हर लॅपींग असल्यामुळे या बाबतीत कायदेशिर सल्ला घेणे आवश्यक आहे.

श्री.ढवळे यांनी सांगीतले की, मध्यस्थ म्हणुन लाईफ ॲण्ड जनरल इन्शुरन्स ब्रोकर्स यांना नियुक्त करण्याबाबत मंडळाने निर्णय घ्यावा.

**ठराव** :- मा.अध्यक्ष यांनी मंडळ सदस्यांना सुचित केले की, सदर बाब कायदेशिर असून या मध्ये जरी लाईफ ॲण्ड जनरल इन्शुरन्स ब्रोकर्स याची मध्यस्थीला मान्यता दिली तरी अंमलबजावणीपुर्वी सदर बाबतचे अधिकार मध्यस्थाला देऊन या बाबत कायदेशिर बाबी तपासण्यात येतील व तसा निर्णय घेण्यात येईल. यास सर्वानुमते ठरावाद्वारे मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.३:- विविध कल्याणकारी योजनांचा आढावा.**

योजनांचा आढावा घेतांना निधी देण्याचे अधिकार विभागीय पातळीवर देण्यात यावेत याबाबत सर्वानुमते चर्चेअंती ठरले

सन्माननीय सदस्य श्री.फुले यांनी विविध जिल्हयांना भेट दिली असल्याचे व अर्ज-सामुग्री तात्काळ उपलब्ध करुन द्यावयाचे सुचित केले. विविध योजनासाठी तपासणीकरीता चेकलिस्ट तयार करुन सर्व कार्यालयांना कळविण्यात येईल. श्री.फुले यांनी सुचित केल्याप्रमाणे नोंदित बांधकाम कामगारांच्या पहीली ते दहावीत शिकत असलेल्या मुलीसाठी रु.६०० रुपये प्रतिवर्षी ही शिष्यवृत्ती योजना त्यांच्या मुलांसाठी देखील लागु करावी, ही बाब सर्वानुमते मान्य झाली.

तसेच श्री.फुले यांनी तांत्रिक शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी., असे सांगीतले.

**विषय क्र.४:- नवीन प्रस्तावित योजनांना मान्यता देणे बाबत.**

मा.अध्यक्षांनी खालील विषय मंडळ सदस्यांच्या निदर्शनास आणुन दिले.

**ठराव** :- १) सर्व प्रकारच्या पदविका व पदवीव्युत्तर पदविका यांनाही वार्षिक २००० रुपये स्कॉलरशिप देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**ठराव** :- २) मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे सुचनेवरुन खालील दोन योजना मंजूर केल्या

A) इंग्रजी शिक्षणासाठी रु.२०००/- प्रती पाल्य २ मुलांकरीता मर्यादित प्रशिक्षण पावत्या सादर केल्यास देण्यात येईल.

B) कामगारांच्या मुलांना (जास्तीत जास्त दोन) संगणकात प्राविण्य मिळविण्यासाठी एमएससीआयटी परीक्षेसाठी अर्थसहाय्य देणे

**ठराव** :- ३) नैसर्गिक प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१०,०००/- देण्यात येईल. सिझेरिअन प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१५,०००/- देण्यात येईल.

**ठराव** :- ४) नोंदीत बांधकाम कामगारांच्या इयत्ता ११ वीतील मुलांकरीता रु.२०००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल. नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलींसाठी विहीत केलेली रु.६००/- ही योजना मुलांसाठीही लागु करण्याचे सुचविले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे यात वृध्दी करुन इयत्ता पहीली ते सातवी साठी १२०० रुपये व इयत्ता आठवी ते दहावीसाठी २४०० रुपये प्रतिवर्षी अशी सुधारणा सर्वानुमते केली.

**ठराव** :- ५) सध्याच्या योजनेनुसार कुंटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास नोंदीत कामगारांच्या एकुलत्या एक मुलीच्या नांवे रु.२५०००/-.त्या मुलींच्या वय १८ वर्षे पुर्ण होईपर्यंत ठेवण्यात येत होती. ती आता दोन मुलींच्या नांवे प्रत्येकी रु.२५,०००/- मुदत ठेव त्यांच्या वयाची १८ वर्षे पुर्ण

होईपर्यंत ठेवण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. सदर योजना मात्र फक्त दोन मुलींपर्यंतच मर्यादित आहे.

६) मा.अध्यक्ष महोदयांनी मंडळ सदस्यांच्या निदर्शनास आणुन दिले की, श्री.भरणा कांबळे,सदस्य तज्ञ समिती यांचे पत्र प्राप्त झालेली असून बांधकाम कामगारांच्या पत्नीस फायदे देण्याची विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन असे ठरले की, नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यास ज्या शैक्षणिक योजना लागु आहेत त्या त्यांच्या पत्नीसही लागु व्हाव्यात त्यास यावर खालील ठराव झाला.

**ठराव :-** नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलास/मुलीस शैक्षणिक योजना लागु आहे त्यां त्यांच्या पत्नीसही लागु व्हाव्यात. सर्वानमुते मान्य झाले.

**विषय क्र. ५ :- मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे विषय –**

श्री.फुले यांनी सांगीतले की,- कर्नाटक सरकारने मंडळाची प्रशासकिय रचना केल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या मंडळाची रचना करावी असे सुचित केले. या बाबत विचार करण्यात येईल. तसेच अध्यक्ष महोदयांनी कामगार आयुक्त कार्यालया अंतर्गत वरळी येथील डी.सी.स्कीमचे कार्यालय मंडळासाठी वापरण्यात येईल व तेथील दुरुस्ती खर्चाची माहिती घ्यावी असे सुचित केले.

अध्यक्ष महोदयांनी चर्चेअंती सांगीतले की, ज्या विभागाने दिलेल्या ५ लाख रुपयांच्या निधीचा हिशोब दिला असेल त्यांना पुन्हा ५ लाख देण्यात यावेत.

श्री.डोंगरे यांनी दिनांक २७/०६/२०१३ रोजीचे पत्र सादर केले, व त्या मधील सुचना केल्याप्रमाणे उपसमित्या विषयवार कराव्यात असे सांगीतले.

मा.अध्यक्षांनी यावर असे सांगीतले की, सदर बाबत नियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक राहील.

श्री.डोंगरे यांनी मंडळाकरीता दोन वाहने विकत घ्यावीत असे सुचित केले. अध्यक्षांनी आवश्यक असल्यास टुरिस्ट व्हेहिकल्स भाडेतत्वावर घ्यावीत असे सुचविल्यानंतर श्री.डोंगरे यांनी किमान एक तरी वाहन मंडळाने घ्यावे असे सुचित केले.

अध्यक्ष महोदयांनी, कामगार कल्याण आयुक्त यांची कार्यालये संपुर्ण महाराष्ट्रातील .

तालुका पातळीवर उपलब्ध असून त्याचा वापर मंडळाच्या कामकाजासाठी वापरणे योग्य होईल व या बाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल असे चर्चेअंती ठरले.

१) श्री.डोंगरे यांनी प्रस्तावित केले की, मंडळ सदस्यांना शासकिय नियमानुसार दैनिक भत्ता देण्यात यावा. या बाबत त्यांना सांगण्यात आले की, सदरचा निर्णय हा शासकिय कर्मचा-यांसाठी लागु आहे. सदर शासन निर्णय मंडळ सदस्यांना लागु करणे उचित होणार नाही. यावर श्री.म्हात्रे यांनी देखील आक्षेप घेतला असून मंडळ कर्मचा-यांसाठी स्वतंत्र शासन निर्णय असल्याचे सांगीतले व त्यानुसार जी.आर पहावा असे सुचित केले.

२) श्री.फुले यांनी सांगीतले की, मंडळ हे कलम ३९ नुसार भत्याबाबत स्वतंत्र निर्णय घेऊ शकते. अध्यक्षांनी सदर बाब शासनास प्रस्तावित करण्यात येईल असे सांगीतले.

३) मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांना अवगत केले की, श्री.बांबोर्डे, सेवानिवृत्त कामगार उप आयुक्त यांनी दिनांक १८/०६/२०१३ रोजी मंडळाच्या सेवेमध्ये घेण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर बाबतीत मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी शिफारस केली असल्याचे सदस्यांना कळविण्यात आलेले आहे. यावर चर्चा झाली व श्री.केदार काळे,मालक प्रतिनिधी यांनी आक्षेप नोंदविला असून उर्वरित मंडळ सदस्यांनी श्री.बांबोर्डे यांची मंडळ सचिव पदी पुर्णवेळ नियुक्तीकरीता शासनास शिफारस करावी व मंजूरी घेऊन निर्णय घ्यावा असे सुचविले श्री.डोंगरे यांनी सुचविले की, श्री.बांबोर्डे यांना एक वर्षाकरीता मंडळ सचिव म्हणुन नियुक्तीसाठी शिफारस करावी व चर्चेअंती श्री.बांबोर्डे यांना मंडळ सचिव म्हणुन नियुक्ती करण्यासाठी शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्याचे बहुमताने ठराव करण्यात आला.

मा.अध्यक्ष यांनी सर्व मंडळ सदस्यांचे आभार मानुन बैठक समाप्त झाल्याचे घोषीत केले.

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ